पदविका [डी. एच. एम. एस. ]होमिओपॅथी महाविद्यालयात [बी. एच. एम. एस. ] पदवी होमिओपॅथी अभ्यासक्रम सुरु करण्यास परवानगी देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,
शासन निर्णय क्र. एचईडी-१४९१/११९४/१७०/९१/एमईडी-७.
मंत्रालय, मुंबई-४०००३२.

दिनांक:१३:मार्च:१९९२.

---

<u>शासन निर्णय:</u>- राज्यातील खाली पदविका होमिओपॅथी महाविद्यालयात पदवी अभ्यासक्रम [बी. एच. एम. एस. ] सुरु करण्याचा प्रस्ताव शासनाचे विचाराधीन होता. सदर प्रस्तावावर सर्वांगीण विचार करुन केंद्रीय होमिओपॅथी परिषद नवी दिल्ली यांनी विहित केलेला बी. एच. एम. एस. [होमिओपॅथी] हा पदवी अभ्यासक्रम सुरु करण्यास खालील होमिओपॅथी महाविद्यालयांना १९९१-९२ या वर्षापासून शासन मान्यता देण्यात येत आहे. ही मान्यता खालील अटींच्या अधीन राहून देण्यात येत आहे. सदर अटींची पूर्तता करणे [illegible] आहे. तसेच सदर अभ्यासक्रम सुरु करण्यापूर्वी संबंधीत विद्यापीठाकडे संलग्नीकरण करण्यात यावे.

१. मोहिनी होमिओपॅथीक ॲन्ड चॅरिटेबल सोसायटी, राजापेठ, अमरावती.
२. पंचशील होमिओपॅथीक शिक्षण प्रसारक मंडळ, खामगांव, जि. बुलढाणा.
३. श्री. नेमिनाथ जैन ब्रह्मचर्याश्रम, [जैन गुरुकुल] मु. पो. नेमिनगर, चांदवड जि. नासिक.
४. श्री. गुरु गणेश स्थानकवासी जैन शिक्षण समिती, श्री. गुरु गणेश नगर, औरंगाबाद.
५. डॉ. जे. जे. मगदूम ट्रस्ट, होमिओपॅथीक कॉलेज, जयसिंगपूर.
६. होमिओपॅथीक मेडिकल कॉलेज, अकोट रोड, अकोला.

२. या संस्थांना पदविका आणि पदवी असे दोन अभ्यासक्रम चालू ठेवता येणार नाहीत. पदवी अभ्यासक्रम सुरु करण्यापूर्वी पदविका अभ्यासक्रम बंद करण्यात यावा पदविका अभ्यासक्रमात विद्यार्थ्यांना प्रवेश देता येणार नाही.

३. या महाविद्यालयांना महाराष्ट्र शासनाकडून कुठल्याही प्रकारचे अनुदान दिले जाणार नाही.

४. पदवी अभ्यासक्रमासाठी प्रवेश देताना महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांकडून कोणत्याही प्रकारचा देणगी घेऊ नये.

५. जे विद्यार्थी महाराष्ट्र माध्यमिक शिक्षण मंडळाची व उच्च माध्यमिक मंडळाची परीक्षा उत्तीर्ण झाले असतील अशा विद्यार्थ्यांनाच सदर परीक्षेतील गुणवत्तेनुसार पदवी अभ्यासक्रमात प्रवेश देण्यात यावा.

६. मागासवर्गीयांना प्रवेश देताना खालीलप्रमाणे आरक्षणाच्या टक्केवारीची अंमलबजावणी करावी. तसेच अशा विहीत जागा भरतांना ठराविक कोट्या व्यतिरिक्त अधिक रक्कम घेतली जाणार नाही याकडे कटाक्षाने लक्ष पुरवावे.

| अनु.क्र. | वर्गवारी | आरक्षित जागेची टक्केवारी. |
|---|---|---|
| १. | अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती ज्या दिनांक १०/११/७६ पासून धर्मांतरीत झाल्या आहेत. | १३% |
| २. | अनुसूचीत जमाती [निर्दिष्ट क्षेत्राच्या बाहेर रहाणा-यासह] | ७% |
| ३. | विमुक्त जाती आणि भटक्या जमाती | ४% |
| ४. | इतर मागासवर्गीय जाती | १०% |
| | एकूण : | ३४% |

७. सदर महाविद्यालयाचे स्वत:चे सुसज्ज व उपकरणे इत्यादींसह प्रमाणित शय्येचे रुग्णालय असावे व त्यामध्ये केंद्रीय होमिओपॅथी परिषदेने विहित केलेल्या प्रमाणकांची परिपूर्ती असावी.

८. केंद्रीय होमिओपॅथी परिषद, नवी दिल्लीने विहित केलेला पूर्णवेळ अध्यापक वर्ग नेमावा.

९. संस्थेने पुढील शैक्षणिक वर्ष सुरु होण्यापूर्वी, शिक्षक, रुग्णालय कर्मचारीवर्ग व उपकरणे इत्यादी बाबतीत जर काही कमतरता असेल तर ती भरुन काढली पाहिजे.

१०. संस्थेचे स्वत:चे परिपूर्ण सुसज्ज असे शरीररचना, शरिरक्रिया शास्त्र तत्व शास्त्र व औषधी निर्माण शाळा इत्यादी विभाग व अत्यावश्यक कर्मचारी वर्ग तसेच उपकरणे साहित्य इत्यादी पुढील शैक्षणिक वर्ष सुरु होण्यापूर्वी असावेत.

११. होमिओपॅथी पदवी अभ्यासक्रमावर होणारा आवर्ती आणि अनावर्ती खर्च स्वत: संस्थेने सोसून पुरेशा निधी अभावी विद्यापीठीय स्तरावर शैक्षणिक दर्जावर विपरीत परिणाम होणार नाही याची संस्थाने कटाक्षाने दक्षता घ्यावी.

१२. संबंधीत विद्यापीठ सदर पदवी अभ्यासक्रमासाठी जी प्रवेश क्षमता ठरवून देईल त्या प्रवेश क्षमतेचे काटेकोरपणे पालन करावे व कोणत्याही परिस्थितीत त्याचे उल्लंघन होणार नाही याची दक्षता घ्यावी. अन्यथा पदवी अभ्यासक्रमाची मान्यता काढून घेण्यात येईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

[signature]

[ सु. श्री. कंटक ]
महाराष्ट्र शासनाचे अवर सचिव.

PRINCIPAL
D.K.M.M. HOMOEOPATHIC
MEDICAL COLLEGE
AURANGABAD - 431 004

पदविका [डी. एच. एम. एस. ]होमिओपॅथी महाविद्यालयास [बी. एच. एम. एस. ] पदवी होमिओपॅथी अभ्यासक्रम सुरु करण्यास परवानगी देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,
शासन शुध्दीपत्रक क्रमांक एचईडी-१५९१/११९४/१५०/९१/एमईडी-७,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक : १३ मे, १९९२.

वाचा :- वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, शासन निर्णय क्रमांक एचईडी-१५९१/१५०/९१/एमईडी-७, दिनांक : १२.३.१९९२.

शुध्दिपत्रक :- वरिल दिनांक १२.३.१९९२ च्या शासन निर्णयातील परिच्छेद एक मधील ५ व्या ओळीत "होमिओपॅथी महाविद्यालयांना १९९१-९२ या वर्षापासून शासन मान्यता देण्यात येत आहे" असे नमूद केले आहे. आता त्या ऐवजी "होमिओपॅथी महाविद्यालयांना १९९२-९३ या वर्षापासून शासन मान्यता देण्यात येत आहे." असे वाचावे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

[ सु. श्री. कटक ]
महाराष्ट्र शासनाचे अवर सचिव.

प्रति,

संचालक, आयुर्वेद संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
सहाय्यक संचालक, आयुर्वेद नागपूर, पुणे, मुंबई.
उप संचालक, होमिओपॅथी रुग्णालय, इर्लानाका, विले पार्ले, मुंबई.
महालेखापाल, २, नागपूर.
प्रबंधक, पुणे, नागपूर व मुंबई, अमरावती व शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.
प्रशासक, होमिओपॅथी कौन्सिल महाराष्ट्र-मुंबई.
प्राचार्य, मोहिनी होमिओपॅथीक मेडिकल सोसायटी, राजापेठ, अमरावती.
प्राचार्य, पंचशील होमिओपॅथीक शिक्षण प्रसारक मंडळ, खामगांव, जि. बुलढाणा.
प्राचार्य, श्री. नेमीनाथ जैन ब्रह्मचर्याश्रम [जैन गुरुकुल],
मु. पो. नेमिनगर, चांदवड. जि. नाशिक.
प्राचार्य, श्री. गुरु गणेश स्थानक वासी जैन शिक्षण समिती, श्री. गुरु गणेश नगर औरंगाबाद.
प्राचार्य, डॉ. जे. जे. मगदुम ट्रस्ट, होमिओपॅथीक कॉलेज, जयसिंगपूर.
प्राचार्य, होमिओपॅथीक मेडिकल कॉलेज, आकोट रोड, अकोला.
सचिव, शिक्षण व सेवायोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
निवड नस्ती एमईडी-७.

टही./१३.५.९२